# प्रकरण चौथे

# ज्ञानेश्वर कोळी यांच्या काव्यलेखनाचे विशेष

# प्रकरण चौथे

# ज्ञानेश्वर कोळी यांच्या काव्यलेखनाचे विशेष

१) प्रास्ताविक

२) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील सामाजिकतेचे भान

३) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील मानवी जीवनाचे चिंतन

४) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेची भाषा: परिवर्तनाची क्रांतीची

५) ज्ञानेश्वर कोळींच्या काव्यलेखनाचे विशेष व मर्यादा

---

## प्रकरण चौथे

# ज्ञानेश्वर कोळी यांच्या काव्यलेखनाचे विशेष

मागील प्रकरणात आपण ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेची अभिव्यक्ती, कवितेतून अभिव्यक्त होणारा समाज, विविध मानवीस्तरांचे केलेले चित्रण, जीवनविषयक जाणीव, वास्तवता त्यातील बदल/परिवर्तन व जागृतीचे भान याचा विचार केला. सदर प्रकरणात ज्ञानेश्वर कोळींच्या काव्यलेखनाचे विशेष पहावयाचे आहेत. ते पुढीलप्रमाणे पाहता येतील.

## १) प्रास्ताविक :

कोणताही कवी आपल्या भावना वाचकापर्यंत पोहचवत असतो व त्या पोहचवण्यासाठी तो स्वत:ची खास पद्धत वापरतो. त्यातूनच त्या कवीची काव्यशैली तयार होते. त्याच्या काव्यलेखनाचे काही वेगळे विशेष किंवा पैलू जाणवू लागतात. ज्ञानेश्वर कोळींनी आपले जीवन, भोवतालचा परिसर, पाहिलेली माणसे, सोसलेलं व पाहिलेलं दु:ख या गोष्टींना शब्दरूप दिले आहे. ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेचे विशेष स्पष्ट करताना कवी सुधांशू लिहितात,

'कवी ज्ञानेश्वर कोळी हा ग्रामीण भागात राहणारा, ग्रामीण जीवनाशी समरस झालेला, ग्रामीण प्रतिभावंत कवी आहे. त्याच्या कवितेत ग्रामीण जीवन, त्यातील गरिबीची होरपळ, एकीकडे वाडे-बंगले, तर दुसरीकडे कौलारू घरे आणि कुडाच्या झोपड्या असे परस्पर विरोधी प्रखर वास्तव मोठ्या जिव्हाळ्याने रसिकांना व मराठी वाचकांना भेटते. त्यांच्या कवितेत कृत्रिमता नाही. सुंदर दिसण्यासाठी उपमा-अलंकाराचा बोजड दिमाख नाही. त्यांची कविता मोकळ्या मनाची, दिलखुलास वृत्तीची, साध्यासुध्या राहणीची एक सुशील खेडूत गृहिणी आहे.'[१]

ग्रामीण भागातील भाषेचे रंग घेऊन कोळींची कविता अवतरते व त्यातील खास ग्रामीण बोलीतील शब्दामुळे ती अस्सल व जिवंत वाटते. कोळींच्या कवितेतून सामाजिकतेचे भान कसे व्यक्त होते ? मानवी जीवनाचे चिंतन कितपत केले आहे ? समाजजीवनातील वर्तमान कालीन भीषण वास्तव व बदल कोळींच्या कवितेतून कसा प्रकटला आहे ? व काव्यातील भाषा परिवर्तनाची व क्रांतीची आहे या मुद्यांचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

## २) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील सामाजिकतेचे भान :

कवीच्या व्यक्तिमत्त्वाची जडण घडण ज्या समाजात होते त्या समाज-वास्तवाच्या छाया-पडछाया त्याच्या काव्यात पडणारच. समाजातील ताण-तणाव, व्यवस्था, प्रश्न, आव्हाने, समस्या काही प्रमाणात समकालीन कवीच्या काव्यात उमटतच असतात. पण त्याचे प्रमाण कमी अधिक असते. या दृष्टीने केशवसुतांची कविता सामाकितेचे भान राखणारी व सामाजिक जाणिवा प्रखरपणे प्रकट करणारी म्हणून सर्वप्रथम उल्लेख करावा लागेल. केशवसुतांच्या कवितेतील सामाजिकतेचे भान याविषयी नागनाथ कोत्तापल्ले लिहितात,

''केशवसुतांची कविता केवळ सामाजिक वास्तवाचा आविष्कार करते असे नाही तर सामाजिक वास्तवासंबंधीचे एक वेगळे जागरूक भानही प्रकट करते 'मजुरावर उपासमारीची पाळी' आणि 'अत्यंजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' या दोन कवितांचा या संदर्भात विशेष उल्लेख करता येईल.''[२] केशवसुतांच्या कवितेबाबत कोत्तापल्ले यांचे हे मत अगदी योग्य आहे.

१९६० नंतर या सामाजिक जाणिवेला समर्थ रूप प्राप्त झाले आहे व १९८० नंतरच्या काव्यात हे सामाजिकतेचे भान अधिकच उमटू लागले आहे. त्यादृष्टीने

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतून व्यक्त होणारे सामाजिक भान पुढीलप्रमाणे सांगता येईल.

ज्ञानेश्वर कोळींनी आपल्या अनेक कवितेतून समाजजीवनाचे चित्रण चित्रित केलेले आहे व कितीतरी सामाजिक जाणिवा त्यातून प्रकटल्या आहेत. मात्र कोळी केवळ समाजाचे वास्तव चित्रण करून थांबत नाहीत तर ते वास्तव बदलावे व समाजाचे हित व्हावे ही तळमळ त्यांच्या काव्यातून दिसते. त्यांच्या कवितेतील सामाजिकतेबद्दल कृष्णा इंगवले यांचे मत महत्त्वपूर्ण वाटते.

''सामाजिक वास्तवपूर्ण आशयाच्या आविष्कारात कोळींच्या कवितेचे सामर्थ्य आहे''[३] असे ते लिहितात.

समाजातील सामान्य माणूस आणि त्याचे जीवन या भोवती फिरणारी कोळींची कविता गरिबी, उपासमार, सामाजिक समस्या, बदलता समाज, संपणारी माणुसकी, दुरावणारी माणसे अशा सर्व घटनांची नोंद घेते. बदलाला ही कविता सामोरी जाते व वास्तवात परिवर्तन व्हावे म्हणून क्रांतीची भाषा करते. एकूणच कोळींच्या कवितेत आत्मभानाबरोबरच सामाजिकतेचे भान प्रकट होते. उदाहरणादाखल काही कविता घेऊन हे अधिक स्पष्ट करता येईल.

ग्रामीण भागातील जीवन जगणाऱ्या ज्ञानेश्वर कोळींना ग्रामीण समाजाच्या समस्या, अडचणी यांचा अनुभव आहे. या ग्रामीण समाजातील पिकांची, जनावरांची, माणसांची अवस्था त्यांनी आपल्या काव्यातून व्यक्त केली आहे. खेडेगावात वेळेवर वीज नसते म्हणजे विजेची टंचाई, वेळेवर पिकांना पाणी नसते अशावेळी शेतातील पीक पिकणार कसे ? ते वाळूनच जाणार ! पाण्याशिवाय गुराढोरांना कसे सांभाळायचे ? म्हणून ती विकली जातात. पोटासाठी व्यापाऱ्याची उधारी असते ती भागवण्यासाठी पुन्हा कर्जे काढावी लागतात. उपवर मुलींची केलेली

लग्न हा या ग्रामीण बांधवापुढचा आणखी मोठा प्रश्न. शेतात पिकणारी तूर, भुईमूग, मूग अशी पिके पाण्याविना घेता येत नाहीत. अशा परिस्थितीत घरातील लोकांची अवस्था काय असते याचे वास्तवचित्रण 'पीक उभे वाळले' या कवितेत कवीने केलेले आहे.

> ''नाही मायीला धडुतं बाप ढाळीतो आसवे
> झिजझिजवी धनीन शेजाऱ्याचे उंबरठे
> कष्ट किती करावयाचे मोल त्याचे संपले ''
>
> ('पीक उभे वाळले', घन दाटलेले, पृ.७)

अशावेळी पोटासाठी माणसे घरातून पांगतात, नाती दुरावतात. शेतातून पाखरे नाहीशी होतात. नोकरीचा शोध घेत माणसे गावातून बाहेर पडतात. गाव उजाड होते त्याची गजबज, वैभव नाहीसे होते. ग्रामीण भागातील प्रत्येक गावाचे हे वास्तव आहे. ज्ञानेश्वर कोळी केवळ हे वास्तव मांडून थांबत नाहीत तर अधिकार व सत्ता असणारी माणसे या भोळ्या लोकांचा कसा फायदा घेतात व स्वत:ची घरे उभी करतात हे सत्य देखील त्यांनी मांडले आहे.

या देशातील शेतकरी, कामकरी बांधवाबद्दल कोळींना कमालीची आत्मियता आहे. म्हणूनच शेतकऱ्याचा उल्लेख ते 'शेतकरी माझा' असा करतात. 'आला बळी रस्त्यावर' (घन दाटलेले,पृ.६) या कवितेत शहरीकरण, यांत्रिकीकरण, संगणकाचे युग याचा शेतकऱ्यावर काय परिणाम झाला आहे ? याचे वास्तव चित्रण करतात. या कवितेतून कवीला हे समाजातील वास्तव बदलायचे आहे याचीही जाणीव शेवटी होते. कारण बळीराजाला क्रांती करण्याचे सूचित करणाऱ्या कवीला शेतकऱ्याला जाग यावी व त्याने पेटून उठावे ही अपेक्षा आहे.

'आता हेच बघ देवा' (घन दाटलेले, पृ.२४) सारख्या कवितेतून 'कुरूपता' माणसाचे जगणे कसे दु:खद बनवते व समाज कुरूप माणसाकडे कसा अलिप्ततेने

पाहतो याचे चित्रण करणाऱ्या कवीने कुरूप माणसाचे दु:ख तर मांडलेच आहे; पण त्याचबरोबर जगातले सगळे जीव सुरूप असावेत असा उदात्त भावही प्रकट केला आहे.

नको देऊस देवा रे
कुरूप हे कुण्याजीवा ।
जीवशीव आनंदाचा
डोही डोही तरंगावा ।।

('घन दाटलेले' पृ. २५)

सर्वांच्या आनंदाचा विचार करणारे कवीचे मन इथे सामाजिक बांधिलकीची जोपासना करताना दिसते. सामाजिक वास्तव कवीला अस्वस्थ करते. देशातील एकंदरीत उद्‌ध्वस्थता पाहून कवीचे काळीज कळवळते. पण संवदेनशील मनाचे कवी या परिस्थितीला संपवून मांगल्याचे गीत गाण्याचा आशावाद बाळगतात.

"लवकरच
माझ्या कवटीच्या कविता
काश्मिरच्या नंदनवनात
उसळणाऱ्या लाटा-लाटावर आणि
चिरलेल्या प्रत्येक दरवाजावर
मांगल्याचे गीत गातील
जन-गण-मन अधिनायक जय हे ।।"

('चिरलेले दरवाजे', घन दाटलेले, पृ. ३२)

'आसं कसं झालं' (आकाश पेलताना, पृ.३१) या कवितेतून कवीची सामाजिक जाणीव अधिकच स्पष्ट होते. अनेक कारणामुळे आज खड्यापाड्यात गोरगरिबांच्या लेकीला आत्महत्या करावी लागते. गावातील लोक बंधुत्वाच्या

नात्याने स्त्रीयांकडे पहात नाहीत उलट त्यांची नजर वाईट असते. घराघरात वैरत्वाचे वातावरण आज वाढले आहे. जुन्या चांगल्यागोष्टी आज समाजातून लोप पावत आहेत व नवे जे जन्माला येते त्यामध्ये चांगले काही आढळतच नाही. शेजारधर्म, माणसातील आपुलकी, जिव्हाळा हे सर्व आज लयाला जात आहे. ही सर्व वास्तव परिस्थिती कवी चित्रित करतो. मात्र शेवटी माणसाने माणसासारखे वागावे हाच संदेश कवीने दिला आहे व माणूस म्हणून जगणे हीच माणसाची खरी नाळ असते असा विचार मांडलेला आहे.

काळाबरोबर बदलत्या समाजाची दखलही ज्ञानेश्वर कोळी घेतात. यंत्राने माणसावर केलेला आघात मार्मिक शब्दात टिपतात तसेच यांत्रिकीकरणाचे दुष्परिणामही सूचित करतात. माणसातील वाढता स्वार्थ, संपत चाललेली माणुसकी, वाढता भ्रष्टाचार यावर कवीने चिंतन केल्याचे आढळते.

समाजातील कौटुंबिक भावबंध,विविध नात्यातील भावछटा कवीने अचूकपणे मांडलेल्या आहेत. माहेरला आलेल्या मुलीच्या भावना, सासरी निघालेल्या मुलीचे भावचित्र, भाऊबीजेला भावाला बोलावणारी बहीण या सर्वांचे हृदयंगम वर्णन कवितेत येते. लहानपणी घरात दारिद्रय असल्याने भावंडे विस्तवावर चकल्या भाजून खात होती. आता मात्र आपल्या भावाला पोटभर जेवायला घालण्याचे स्वप्न ही बहीण पहाते आहे.

“तवा चकल्या खायाचा
ईस्तवात भाजुनिया
तुझी आवड म्हणूनी
चकली तळून केलीया ”

('भाऊराया', आकाश पेलताना, पृ. ३)

समाजातील दारिद्र्य, बेकारी, अंधश्रद्धा, समाजातील विविध प्रश्न, समस्या, वेगवेगळ्या पद्धती-परंपरा, समाजातील विविध स्तर या सर्वांचा समावेश कोळींच्या कवितेत होतो. त्यांच्या कवितेतून त्यांनी पाहिलेला समाज, आजुबाजूचा परिसर, तेथील लोकांचे जगणे प्रखरपणे जाणवते. समाजातील लोकांच्या व्यथा-वेदना ते मांडतात. त्याचबरोबर या लोकांचे दु:ख दूर होईल असा अदम्य आशावादही बाळगतात.

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतून फक्त ग्रामीण समाजाचे चित्रण उभे रहात नाही तर शहरी भागातील वातावरणावरही प्रकाश पडतो. शहरात देवळाबाहेर बसणारे भिकारी, रस्त्यात गाड्यावर बसून भीक मागणारे अपंग भिकारी, माणुसकी शिल्लक नसणारा समाज, होत असणारे आधुनिकीकरण, मुंग्यांच्या रांगेप्रमाणे जगणारी माणसे, घड्याळाच्या काट्यावर धावणारी माणसे हे सर्व चित्र शहरी भागातील आहे. समाजातील सर्व घटकावर, सर्व स्तरातील माणसांवर कोळी प्रकाश टाकतात.

समाजातील जळजळीत वास्तव कोळींच्या कवितेतून मांडलेले आहे व त्यापुढे जाऊन हे वास्तव बदलण्यासाठी क्रांतीची भाषा बोलणारा कवी सामाजिक अभ्युदयाचा विचार मांडताना दिसतो. कटू वास्तव बदलण्यासाठी परिवर्तनाची ज्योत आपल्या शब्दातून जागवण्याचा प्रयत्न करतो.

थोडक्यात ज्ञानेश्वर कोळींची कविता सामाजिकतेचे भान राखणारी कविता आहे.

**कोळींच्या कवितेतील मानवी जीवनाचे चिंतन – स्वरूप :**

ज्ञानेश्वर कोळींची कविता मानवी जीवनाचे सखोल चिंतन करते व त्या चिंतनातून विविध जाणिवा प्रकट करते. मानवी जीवनाचे विविध स्तर, मानवाची

जीवनशैली, मानवी जीवनातील परिवर्तन, मानवी जीवनाची नश्वरता, विविध व्यथा-वेदना, माणुसकीचे श्रेष्ठत्व अशा सर्व गोष्टींचे चिंतन त्यांच्या कवितेत आढळते.

लहानांपासून वृद्धांपर्यंत, श्रीमंतापासून भिकाऱ्यापर्यंत पतिव्रतेपासून मुरळीपर्यंत उच्च विद्याविभूषितांपासून अडाणी कामगारापर्यंतचे सर्व स्तर कोळींच्या कवितेत आलेले आंहेत. यापैकी प्रत्येकजण माणूसंच आहे. या माणसाने जन्मास येऊन नेमके काय कार्य केले ? असा प्रश्न कवींना पडतो.

‘‘जन्मास आम्ही आलो
जन्मून काय केले ?
माणूस म्हणूनि आम्ही
माणसास काय केले ?’’

(‘काय केले ?’ जगणे माझे, पृ.१५)

जन्मलेला प्रत्येक जीव एक दिवस नष्ट होणारच आहे. मृत्यू हा शाश्वत आहे. मानवी जन्म मिळाल्यावर प्रत्येकजण आपल्या देहाचा गर्व मिरवतो, मोठमोठ्या महत्त्वाकांक्षा बाळगतो, स्वप्ने बाळगतो. आपण पृथ्वीचा मालक आहे असे माणूस वागत असतो. झाडे, पाणी, विश्व यावर सत्ता गाजवणारा माणूस प्रत्यक्षात मात्र फक्त स्मशानाचा मालक असतो. कारण एक दिवस प्रत्येकाला जावे लागणार आहे हाच जीवनाविषयीचा विचार कवी ‘मालक’ (जगणे माझे, पृ.१७) या कवितेत मांडतात. ‘कोठून आलो ?’ (जगणे माझे, पृ.३९) ही कविताही याच आशयाची आहे. माणूस जन्मन्यापूर्वी काय होतं ? पुढं काय असेल ? हे कोणालाही कळत नाही. माणूस बाहुली सारखा नाचत असतो, दोरी मात्र विधात्याच्या हातात असते. कोठून आलो ? व कुठे जायचे ? हे प्रश्न मात्र माणसाच्या पूर्ण आयुष्याला भेडसावत असतात.

‘‘मी कोठून आलो आहे ?
आणखी कोठे जायचे आहे ?

काहीच माहित नाही !
जायचं मात्र निश्चित आहे !!"
('कोठून आलो ?', जगणे माझे,पृ. ३९)

आईच्या उदरातून बाहेर येणारा ! जीव रडतच पृथ्वीवर प्रवेश करतो. काही दिवस त्याचे लाड-कौतुक होते पण एकदा का तो जीव मोठा झाला की त्याला प्रत्येक पावलाला संघर्ष करावा लागतो. वेदना सहन करावी लागते. ज्याला दुःख नाही असा एकही जीव आढळणार नाही. फक्त प्रत्येकाच्या दुःखाचे स्वरूप भिन्न असते. तरीही प्रत्येक माणूस ही वेदना पचवत जगत राहतो. कारण मरणापेक्षा हे दुःख त्याला सोपस्कर वाटत असते. असा विचार कवी 'गंमत फार छान असते !' (आयुष्याच्या वाटेवर, पृ. २१) या कवितेत मांडतात. 'कंदिल' (आयुष्याच्या वाटेवर, पृ.२१) या कवितेतही कवी जीवनातील दुःखाचे दर्शन घडवतो. 'रांग मुंग्यांची चालली' (आकाश पेलताना, पृ.९) 'मातेरं', (आकाश पेलताना, पृ.४९), 'फक्त प्रवास आहे' (आकाश पेलताना, पृ. ३३) या कवितातूनही मानवी जीवनातील दुःखाची जाणीव स्पष्ट होते.

परमेश्वरानं माणसाला पृथ्वीवर पाठवलं. त्याला सुंदर असा नरदेह दिला. परंतु माणसाने या जन्माचे सार्थक न करता दुरूपयोगच केला. लाच घेऊन हा मानव आज भ्रष्ट झाला आहे. मानवाने खूप संपत्ती कमावली व या दौलतीच्या जोरावर तो देवालाही कमी लेखू लागला. बलात्कारासारख्या घटना घडू लागल्या तेव्हा मानव-जातीलाच कलंक लागू लागला. मानवाचे हे दुष्ट चक्र चालू आहे आणि युगानुयुगे चालू रहाणार आहे, पण जेव्हा अशा गोष्टींचा अतिरेक होईल तेव्हा मात्र परमेश्वर कोपल्या शिवाय रहाणार नाही. मानवाच्या पराधिनतेची जाणीव तेव्हा तो करून देईल हा विचार मांडताना 'फक्त येणं आहे' या कवितेत कवी लिहितात,

"आता -
तुझ्याकडून फक्त येणं आहे

कॅन्सर – पॅरालिसिस
आणि लेप्रसी सारखे
देदीप्यमान हिरे–माणके
जन्मापासून – मृत्यूपर्यंत !''

('फक्त येणं आहे', जगणे माझे, पृ.६)

मानवाने मानवी जीवनाचा कितीही गर्व बाळगला कितीही संपत्ती कमावली तरी त्याचे आयुष्य स्वावलंबी कधीही बनू शकत नाही. एखादा गंभीर आजारी माणसाचे सर्व वाईट कर्तृत्व जाग्यावरच थांबवू शकतो. हा विचार कवी व्यक्त करतो.

'मरणाची वाट' (जगणे माझे,पृ.३५) ही अशीच मानवी जीवनावर चिंतन करणारी कविता आहे. माणूस शिक्षण घेतो, मोठा होतो व आपल्या या ज्ञानाचा लबाडी करण्यासाठी उपयोग करून घेतो. भिकारी म्हणून जगणारे लोक कसेतरी पोट भरतात आणि देवाला शिव्या घालत जगत राहतात. सभ्य म्हणून जगणारे लोक प्रत्यक्षात मात्र असभ्य कृत्ये करत असतात. खूप संपत्ती कमवणारे मरताना सोबत काहीही घेऊन जाऊ शकत नाहीत. जमीन–जुमला, पैसा सर्व पाठीमागे राहते. म्हणूनच या कवितेतून कवी मरणाची शाश्वतता पटवून देतात व यातून कुणीही सुटणार नाही हे सत्य निदर्शनास आणून देतात.

''सारंच कसं क्षम्य आहे
जिकडं तिकडं गम्य आहे
दु:खाचा भव्य पहाड
सर्वांनाच खेचत आहे
आला देह निमाला देह माती देखील शून्य आहे
जो तो आता झक मारत मरणाची वाट बघत आहे ''

('मरणाची वाट', जगणे माझे, पृ. ३६)

मनुष्य आयुष्यभर कितीही कर्तृत्वाची उमेद बाळगत असला तरी ‘मरण’ हेच अंतिम सत्य आहे हा विचार कवी प्रस्तुत कवितेत मांडतात.

बदलत्या मानवी जीवनाचा आढावा कवी ‘रांगावरी रांगा’ (घन दाटलेले, पृ. ३) या कवितेत घेतात. आज मानवी जीवन गतिमान बनले आहे. हसत-रडत वेगाने चाललेली माणसे आसपास पहावयास मिळतात. लाचारीने जगणारी ही माणसे सर्व गोष्टी गप्प राहून सहन करतात. यंत्रयुगात जगणाऱ्या या माणसांना फक्त भौतिक सुखाचाच हव्यास आहे. भौतिक सुखासाठीच या माणसांचा आटापीटा चाललेला असतो हे आजच्या युगातील मानवाचे चित्रण कवीने केलेले आहे.

‘अस्तित्त्वाच्या शोधात’ ही कोळी यांची चिंतनशील कविता आहे. स्वतःचे प्रेत स्वतःच्या खांद्यावर घेऊन आपल्या अस्तित्वाच्या शोधात निघालेला कवी आजच्या मानवी जीवनाचे प्रतीक आहे. विचारी मेंदू कुरतडून खाणाऱ्या काळ्या-पांढऱ्या उंदरांच्या माध्यमातून कवी आजच्या समाजातील शोषण करणाऱ्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकतो. आपला आयुष्यातील दुःखाचे मूळ शोधण्यासाठी शेवटी कवी स्वतःच बाहेर पडताना दिसतो.

‘‘मी थोडा घाबरलो-जरा सावरलोही
माझं प्रेत मी घेतलं खांद्यावर
तडक निघालो स्मशानाकडे
माझ्या दुखऱ्या
अस्तित्वाच्या शोधासाठी ’’

(‘अस्तित्वाच्या शोधात’, घन दाटलेले, पृ. ३३)

प्रस्तुत कवितेतून कवी मानवी जीवनाच्या अस्तित्वाचा शोध घेताना दिसतो.

‘नाही-नाही’ (घन दाटलेले, पृ. ५) या कवितेतून कवीने नात्यांचा फोलपणा आणि मानवी देहाची नश्वरता स्पष्ट केली आहे. बहीण-भाऊ, आई-बाप, बायको-मुले हे सर्व बंध केवळ भास आहेत हा विचार प्रस्तुत कवितेत कवी मांडतात.

दारिद्रयामुळे आयुष्याला येणारे बकालपण आणि त्यातून निर्माण होणारे नैराश्य कवी 'थंडी' (आयुष्याच्या वाटेवर, पृ. ८०) 'काल म्हणालीस' (आयुष्याच्या वाटेवर, पृ.४१), 'सवयं' (आयुष्याच्या वाटेवर, पृ.४१) या कवितेतून मांडतात. आयुष्याला दु:खाने व्यापलेलं असताना केवळ मरण येत नाही म्हणून जगणारे अनेकजण असतात. रडत-खडत आयुष्य जगणाऱ्या या लोकांविषयी कवी लिहितात,

"शिशिरातल्या थंडीनं
सारं आयुष्य गोठून गेलंय
मरणही येत नाही म्हणून
राहिलेलं आयुष्य
शेकायचं आहे
वास्तवतेच्या शेकोटीवर"

('थंडी', आयुष्याच्या वाटेवर, पृ.३०)

किंवा

"दु:खाच्या जखमेतून
वेदनांचा 'पू' पाझरतोय
भिजलेली कपडे
चिकटून बसलेत अंगाला
बँडेजसारखे"

('सवय', आयुष्याच्या वाटेवर, पृ.४१)

मानवी जीवनाला ग्रासलेल्या दु:खाचे हे वर्णन कोळींच्या अनेक कवितेतून येते. मात्र कवी दु:खाला घाबरून आयुष्यातून माघार मात्र घेत नाही. उलट या दु:खाशी सामना करून आयुष्यात सुख आणण्याचा आशावाद बाळगतो. मानवी जीवनाचे सखोल चिंतन कोळींच्या कवितेत आलेले आहे. जीवनातील अनेक घटना,

सुख-दु:खे यावर प्रकाश टाकत असतानाच कवी मृत्यूचे सत्य मांडण्याचा प्रयत्न करतो व जीवनाची क्षणभंगूरता पटवून देतो. मानवी जीवनचिंतनाची कवीने व्यक्त केलेली जाणीव सर्वव्यापी आहे. सर्व स्तरातील घटकांचा समावेश कवी आपल्या कवितेत करतात. ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील जीवन चिंतनाविषयी प्रा. चंद्रकात पोतदार लिहितात,

"भयकंपितपणा, दुखरेपणा या बरोबरच असहायतेची एक नवी दृष्टीच या काव्याला प्राप्त झालेली आहे. वास्तवता आणि वेदनेचे जग वारंवार कवितेत व्यक्त होत राहते. अनेकदा कवितेतले जीवन आणि कवितेतूनच व्यक्त होणारी सशक्तता यांचे संमिश्ररूप कवीच्या आणि कवितेच्या दृष्टीने खूपच महत्त्वाचे आहे. दैनंदिन जीवन जगताना जगण्याच्या प्रत्येक क्षणाला मिळणारा नकारात्मकतेचा प्रसाद काही जाणीव करूनच देतो. कारण एक तर जगण्यातून स्वत:ला व्यक्त होता आलं पाहिजे. शिवाय जगण्याच्या मुळाशी असणाऱ्या हजारो प्रश्नांचा गुंता सोडवता आला पाहिजे. असा हा गुंता सोडवत सोडवत जगण्याचे असलेले नवे भानही जपले पाहिजे. या सर्वच पातळीवर प्रकट होणारी कोळींची कविता नव्या पिढीचं प्रतिनिधित्वच करते."[४]

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील मानवी जीवनचिंतन अभ्यासल्यानंतर पोतदार यांच्या वरील मताचा प्रत्यय येतो. कोळींच्या कवितेतून साकार होणारे मानवी जीवन हे सुखा-समाधानाचे नाही तर कष्टाचे, दु:खाचे, निराशेचे, संघर्षाचे, अतृप्ततेचे, वंचिततेचे, वेदनेचे सावट या पूर्ण जीवनावर पसरलेले आहे सर्वसामान्य माणसाच्या जीवनाची कहाणीच त्यांच्या कवितेतून व्यक्त होते. याविषयी शिवाजी पाटील लिहितात,

"ज्ञानेश्वर कोळींची कविता समाधानाने तृप्त ढेकर देणारी नाही. त्या कवितेला घामाचा, श्रमाचा, आटलेल्या रखताचा वास आहे. मनातल्या जीवघेण्या काळातून शब्दांचा झालेला प्रसव म्हणजे त्यांची कविता आहे."[५]

अशाप्रकारे जीवनातील अनुभवातून कोळींची कविता जन्मते व ती जीवनाचेच भाष्य करते. पण हे जीवन कवीचे एकट्याचे रहात नाही तर संपूर्ण मानवी जीवनाचे प्रतिनिधित्व त्यास प्राप्त होते.

**ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेची भाषा : परिवर्तनाची–क्रांतीची भाषा**

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतून जीवनविषयक, सामाजिक, निसर्गासंबंधी, काव्यविषयक अनेक प्रकारच्या जाणिवा प्रकट झाल्या आहेत. तसेच समाजातील भीषण वास्तव त्यांच्या कवितेतून चित्रित झाले आहे. परंतु केवळ हे वास्तव मांडून कवी शांत रहात नाहीत, तर हे वास्तव बदलण्यासाठी क्रांतीचे अवाहन करतात. परिवर्तनासाठी सजग राहतात. त्यांची कविता अन्यायाला नष्ट करण्याची, अनिष्ट रूढींना संपवण्याची व स्वतःच्या उद्धारासाठी संघर्ष करण्याची, क्रांती करण्याची भाषा बोलते. हा क्रांतीचा सूर त्यांच्या अनेक कवितांमध्ये उमटताना दिसतो.

भारत हा कृषिप्रधान देश. शेतकऱ्यांचा देश. पण आज इथला शेतकरी कर्जबाजारी झाला. त्याची अवस्था भिकाऱ्यासारखी झाली. सर्वांची पोटं भरणारा हा अन्नदाता मात्र आज उपासपोटी राबतो. नेते. अधिकारी, व्यापारी या सर्वांचा अन्याय शेतकरी सहन करतो. परंतु आजा मात्र बळीराजाने हा अन्याय सहन करू नये, आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध त्याने बंड करावे आणि क्रांती घडवून आणावी असे कवीला वाटते. म्हणूनच क्रांती करणाऱ्या बळीचे चित्र ते रंगवितात.

''ईळा खुरपं घासुनिया
आला बळी रस्त्यावर
छन्नी हातोडा उगारी
कष्टकरी कामगार
क्रांती लाल सुरू झाली पाट रक्ताचा वाहिला '' ।।४।।

आज समाजात महागाई, बेरोजगारी, गरिबी अशा संकटानी सामान्य माणूस हैराण झाला आहे. आपल्या या संकटाचे निवारण करण्यासाठी तो अनेकांचे पाय धरतो. आर्जव करतो. परंतु अधिकार व सत्ता असणारी मंडळी मात्र त्याला मदत करत नाहीत. उलट आपलाच स्वार्थ पहातात. अधिकारी लोक कामे करण्यासाठी लाच मागतात. पुढारी लोक मते मागतात. भांडवलदारही सामान्यांची दाद घेत नाहीत. अशावेळी सामान्य जनता भरडली जाते. या जनतेची स्वप्ने पूर्ण होत नाहीत. या हताश झालेल्या जनतेच्या उद्धारासाठी दुसरे कुणीही मदत करणार नाही तर या सामान्य जनतेनेच क्रांती करण्यासाठी सज्ज व्हावे हा विचार 'पुढं काय कराचं त्ये बघू या' (जगणे माझे, पृ.१९) या कवितेत व्यक्त झालेला आहे.

माणूसकी संपून समाजात केवळ अमानुषपणा उरला आहे. हा अमानुषपणा संपवण्यासाठी कवी नव्या पिढीला क्रांती करण्यास उद्युक्त करतात.

''उठा युवकांनो घ्याच बंदुकी
नराधमांची उडवा डोकी
या गोळीने या त्वेषाने ठेवू हा बाजार ''

('मानवा', जगणे माझे, पृ.२७)

किंवा

''दळिंद्रीच्या जातीसाठी
लालक्रांती स्वप्नात आली
लालक्रांतीच्या प्रकाशाने
लोकशाही जिवंत झाली ''

('लाल क्रांती', आकाश पेलताना, पृ.२८)

समाजात आज विषमता आहे. कुणी श्रीमंत आहे तर कुणी गरिबीचे जीवन जगतो आहे. श्रीमंतांचे जीवन सुखाचे आहे, आनंदाचे आहे. दिवाळीसारख्या सणाला तर हा आनंद अधिकच असतो. फराळाच्या पदार्थाचा वास घरा-घरातून सुटलेला

असतो. गरिबांच्या पालात मात्र उद्या झोळी भरेल का ? याचीच चिंता असते. दिवाळीच्या सणात किती मागू ? किती खाऊ ? अशी या पालातल्या मुलांची अवस्था होते. मात्र काही लोक घरात असूनही या मागणाऱ्या मुलांना अन्न देत नाहीत अशा ठिकाणी सुरुंग लावण्याची क्रांतीची भाषा कवी 'दिवाळी' (जगणे माझे, पृ.२३) या कवितेत बोलताना दिसतात.

गरिबांच्या गरिबीवर कादंबऱ्या व कविता लिहिणारे आज बंगले बांधून राहू लागले. गरिबांचे दु:ख मांडणारी ही माणसे स्वत: मात्र गरिबीत जगली नाहीत. त्यांनी गरिबांसारखे शिळे-इटके अन्न खाऊन दिवस काढले नाहीत, फाटकी कपडे घालण्याची वेळ त्यांच्यावर कधी आली नाही. मग गरिबांच्या व्यथा-वेदना त्यांना कशा कळणार ? केवळ गरिबांचे चित्रण करून पैसा कमवणे हेच या लेखकांचे काम आहे हे जेव्हा त्या पीडितांना कळले तेव्हा ते लेखकांना सांगू लागले की 'आमचं काय बी लिवू नका !' या लोकांमध्ये आता आत्मभान निर्माण झाले आहे. आपल्या विषयी आता आपण स्वत:च लिहू. आपली दु:खे आपणच वेशीवर टांगू ही परिवर्तनाची भावना आज दु:खितांमध्ये निर्माण झालेली दिसते.

''आता माणसानु एक करा
आमचं काऽयबी लिवू नका
आता आमीच हाडकाचं बरू केल्यात
कातड्याचा कागुद केलाय
कवटीत रगात साठिवलय
आता आमचं दुखणं आमीच लिवतू !
आमचं दुखणं आमीच लिवतू !''

('आमचं कायबी लिवू नका !', जगणे माझे, पृ.३३)

'माफ करा शांतनुराव'(आकाश पेलताना, पृ.३६), 'संघटना' (आकाश पेलताना, पृ.५०), 'तो माझा दिवस' (आकाश पेलताना, पृ.५४), 'बाजारात' (घन दाटलेले, पृ. ३४), 'अण्णा' (घन दाटलेले,पृ.४५), 'वखारवाल्यांनो' (आयुष्याच्या वाटेवर, पृ.११), 'मित्रास पत्र' (आयुष्याच्या वाटेवर, पृ.४७) या सर्वच कविता 'सामाजिक वास्तव बदलण्यासाठी क्रांतीची भाषा बोलणाऱ्या, परिवर्तनासाठी अवाहन करणाऱ्या कविता आहेत.

आजपर्यंत समाजात अनेक अनिष्टप्रथा, रूढी परंपरेने चालत आलेल्या आहेत. त्या प्रथांचे परिणाम समाजातले अनेक घटक भोगत आहेत. 'मुरळी' ही अशीच एक प्रथा ! उदं-उदं म्हणत, भंडारा उधळत, जोगवा मागत फिरणारी ही स्त्री आजही समाजात उपेक्षित जीवन जगत आहे. देवाच्या नावाखाली समाज या स्त्रीवर अन्याय करतो. त्या स्त्रीलाही मन आहे. तिलाही तिच्या इच्छेनुसार आयुष्य जगण्याचा अधिकार आहे याचा विचार कुणीही करत नाही. आजपर्यंत ही मुरळी परडी, जग, पोत, माळ, भंडारा, घाटं या सगळ्यांचा सांभाळ करीत आली. पण आता मात्र तिनं हे सगळे फेकून द्यायला हवं. नष्ट करायला हवं आणि आपल्याला उपेक्षिताचं जीवन जगायला लावणाऱ्या व अन्याय करणाऱ्या विरूद्ध हत्यार उगारायला हवं. ही परिवर्तनाची जाणीव देणारी 'ऐक पोरी सांगते तुला' ही ज्ञानेश्वर कोळींची महत्त्वपूर्ण कविता आहे.

> ''तुळजापूरची भवानी आय
> तुझ्यापरीस वेगळी न्हाय
> झाशीची राणी तुला
> ढाल तलवार देणार हाय
> आलाच पुन्हा वाघ्या-भोग्या त्याला उभा चिरायचा हाय
> एक पोरी सांगते तुला उदं-उदं म्हणायचं न्हाय''
>
> ('ऐक पोरी सांगते तुला', आयुष्याच्या वाटेवर, पृ. ३२)

ज्ञानेश्वर कोळी यांच्या क्रांतीकारी भाषेबद्दल डॉ. बाबुराव गुरव लिहितात –

"ज्ञानेश्वर कोळी यांची माणसांच्या असंतोषाची एकतारी मराठीतल्या क्रांतीच्या कवितेच्या जल्लोशाला सहाय्यकारी सूर लावण्याचा प्रयत्न करते. ज्ञानेश्वर कोळी यांची कविता हा अगतिकतेचा भयकंपाने थरारलेला शब्द आहे. आवती भोवती जनसंघर्षाच्या अनुकूलतेचे पडघम वाजू लागतात. तेव्हा हा शब्द मोहरतो. क्रांतीकारी कलात्मकतेच्या अंगाने फूलू लागतो."[६]

विषमता, दारिद्रय, बेकारी, अमानुषता, अन्याय, अत्याचार, स्वार्थी प्रवृत्ती या सर्व अनिष्ट बाबी संपण्यासाठी कवी आपले शब्द धारदार बनवतो. आपले शब्द आता वास्तव बदलतील, क्रांती घडवतील ही आशा कवीलाही आहे. म्हणूनच 'कविते' कवितेत ते लिहितात,

"माझ्या रंध्रांना देखील
फुटलेत कोंब–क्रांतीचे
धार–धार शब्दांचे
आकाश फाटून –
क्षितिजापल्याड जाणारे !"

('कविते', जगणे माझे, पृ. २)

अशाप्रकारे कोळींच्या कवितेतील भाषा परिवर्तनाची भाषा आहे. आहे हे वास्तव बदलण्याची इच्छाशक्ती कवी बाळगतो व त्यासाठी इतरांमध्येही चैतन्याची जाणीव आपल्या कवितेतून निर्माण करण्याचा प्रयत्न करतो.

कवी क्रांतीची भाषा बोलतो मात्र त्यात कुठेही आक्रस्ताळेपणा, भडकपणा पहावयास मिळत नाही. आपल्याला जे मिळवायचे आहे त्यासाठी संघर्षाला तयार असणारे हे कवीमन तळमळीने बदलाची अपेक्षा मांडते.

## ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेचे विशेष व मर्यादा :

ज्ञानेश्वर कोळींची कविता सामाजिकतेचे भान राखणारी कविता आहे. त्यांच्या एकूण कवितात सामाजिक कविता संख्येने अधिक आहेत व आशय अभिव्यक्तीच्या दृष्टीने मूल्ययुक्त व लक्षणीय आहेत.

कोळींच्या कवितेतून मानवी जीवनाविषयी अनेक जाणिवा प्रकट झालेल्या आहत. दुःख पचवून उभे राहण्याची, नवी वाट चोखाळण्याची, भविष्याला सामोरे जाण्याची आशावादी दृष्टी ही कविता प्रकट करते.

अर्थपूर्ण शब्दयोजना, अन्वर्थक प्रतिमा व रूपके यामुळे कोळींची कविता योग्य परिणाम साधते. विविध अलंकार, म्हणी,वाक्प्रचार यांचा प्रभावी वापर कवीने केलेला आढळतो. ज्ञानेश्वर कोळींची कविता आत्मशोध घेणारी कविता आहे. मात्र आत्मशोध घेता घेता ही कविता जीवनशोधही घेते. त्यामुळे स्वतःच्या वर्तुळात न फिरत राहता ही कविता समाजाभिमुखही बनते.

कोळींच्या कवितेची भाषा सोपी, रसिकांना समजणारी आहे. लय, नाद, यामुळे कवितेला गेयतेची जोड लाभलेली दिसते. कोळींच्या कवितेला एक वेदनेची,दुखरेपणाची किनार लाभलेली आहे. ही दुःख जाणीव सर्व कवितातून झिरपताना दिसते. मात्र या दुःखाविषयी कवी केवळ तक्रार करत नाही तर या दुःखावर मात करण्याची उमेद बाळगताना दिसतो.

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेत विषय-विविधता व व्यापकता आढळते. समाजातील सर्व घटक, सर्व स्तर त्यांच्या कवितेचे विषय बनले आहेत.

कोळींची कविता समाजातील वास्तव प्रकट करते व सामाजिक बदलाची नोंद घेते. सामाजिक रूढी-संकेतांचे सुक्ष्म निरीक्षण त्यांच्या कवितेत आलेले आहे.

आजुबाजूचा निसर्ग कोळींच्या कवितेत अगदी सूचकतेने आलेला आहे. निसर्गातील सुक्ष्म बारकावे कवीने टिपलेले आहेत. कोळींच्या कवितेत शब्दांची ओढाताण जाणवत नाही तर सहजसोपी व अर्थवाही रचना आढळते.

कोळींनी प्रेमकविता श्रृंगारापेक्षा भावभावनांना महत्त्व देऊन लिहिलेल्या आहेत. प्रेमकवितांची संख्या मात्र मर्यादित आहे व इतर कवितांच्या तुलनेत प्रेमकविता सुमार दर्जाच्या वाटतात.

माणसाची सुख-दु:खे, स्वप्ने आणि स्वप्नभंगाची अपूर्ण रूपे कोळींची कविता मांडते.

कोळींच्या कवितेतून कौटुंबिक भाव-बंधही उलघडतात व अनेक नात्यावर प्रकाश पडतो. कोळींच्या काव्यसंग्रहाची व कवितांची शीर्षके सूचक आहेत. कवितातील आशय पाहता या शीर्षकांची अन्वर्थकता पटते. वर्तमानकालीन जीवनाच्या व्यथा-वेदना प्रभावीपणे मांडणारी कोळींची कविता समाज व मानवी जीवन बदलण्यासाठी क्रांतीची भाषा बोलताना दिसते.

कोळींच्या काही कवितात मात्र एकसंघपणाचा अभाव व तुटकपणा जाणवतो. परंतु अशा कवितांची संख्या अत्यंत अल्प आहे.

----

## प्रकरण चौथे

## संदर्भ सूची


१) सुधांशु : 'पुस्तक परीक्षण', दक्षिण महाराष्ट्र केसरी, दि.२७.१०.९६.

२) कोत्तापल्ले, नागनाथ : 'आधुनिक मराठी कविता : एक दृष्टिक्षेप', प्रतिभा प्रकाशन, परभणी, प्रथमावृत्ती, जाने, १९९९, पृ. १०४)

३) इंगवले, कृष्णा : 'पुस्तक परीक्षण', पुढारी, दि. २३ जून, २००२.

४) पोतदार, चंद्रकांत : 'निवडक ज्ञानेश्वर कोळी', संपा- पोतदार चंद्रकांत, निर्मिती प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००५, पृ. १३.

५) पाटील,शिवाजी : 'साक्षात', त्रैमासिक, जानेवारी, २००७, पृ. ९.

६) गुरव, बाबुराव : 'साप्ताहिक छावणी' दीपावली विशेषांक,सन २०००, पृ. ९१.


----